महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित.
एस्ट्रेला बॅटरीज एक्स्पॉन्शन कंपाऊंड इमारत, तळमजला,
लेबर कॅम्प,धारावी रोड, माटुंगा,मुंबई-४०० ०१९,दूरध्वनी क्र.०२२-६९४२५०००,
ईमेल: agmhrc@mahagenco.in वेबसाईट : www.mahageco.in

क्र.महानिर्मिती/मासं-से.प्र/तंत्रज्ञ-३/ № 03732 दिनांक: 29 APR 2025

## सूचना

**विषय :- तंत्रज्ञ-३ या पदाच्या ऑनलाईन परीक्षेकरीताचे प्रवेशपत्र आणि महत्त्वाच्या सूचना**

**संदर्भ :-**१.महानिर्मिती जाहिरात क्र.०४/२०२४
२.महानिर्मिती जाहिरात क्र.०४/२०२४ चे सुधारपत्र क्र.१२११० दि.२८.११.२०२४
३.महानिर्मिती सूचना क्र.५३ दि.०३.०१.२०२५
४.महानिर्मिती जाहिरात क्र.०४/२०२४ चे सुधारपत्र क्र.१९१ दि.०७.०१.२०२५
५.महानिर्मिती जाहिरात क्र.०४/२०२४ चे सुधारपत्र क्र.८९२ दि.२९.०१.२०२५
६.महानिर्मिती सूचना क्र.३४७१ दि.२२.०४.२०२५

---

महानिर्मिती कंपनीतर्फे जाहिरात क्र.०४/२०२४ अन्वये तंत्रज्ञ-३ यांची रिक्त पदे सरळसेवा प्रवेशाद्वारे भरण्याकरीता जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर जाहिरातीस अनुसरुन तंत्रज्ञ-३ या पदाची ऑनलाईन परीक्षा दि.०८, ०९, १०, व १५.०५.२०२५ (दिनांक १९.०५.२०२५ रोजी परीक्षा घेण्यात येणार नाही याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी) रोजी घेण्यात येणार आहे. करिता उमेदवारांनी ऑनलाईन परीक्षा प्रवेशपत्र प्राप्त करुन घेण्यासाठी खालील ठिकाणी क्लिक करावे.

**ऑनलाईन परिक्षेकरीताचे प्रवेश पत्र प्राप्त करण्याकरीता येथे क्लिक करावे.** ←

## सूचना

१) उमेदवारांना सूचित करण्यात येते की, उमेदवारांनी प्रवेशपत्राच्या किमान ०२ प्रती (02 Print outs) काढून घ्याव्यात. उमेदवारांना ज्या वेळी प्रवेशपत्राची मागणी करण्यात येईल, त्या वेळी उमेदवारांजवळ प्रवेशपत्राची प्रत असणे आवश्यक आहे, याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

२) उमेदवारांनी ऑनलाईन आवेदन करतेवेळी अर्जात भरलेल्या ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांकावर प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याकरीताचा ई-मेल व संदेश पाठविण्यात आलेला आहे.

३) ज्या उमेदवारांनी महानिर्मिती कंपनीचे पात्र प्रकल्पग्रस्त प्रगतकुशल कोटयातंर्गत अर्ज सादर केला आहे, परंतु जाहिरातीत नमूद अटीनुसार संबंधित विद्युत केंद्राकडे अर्जाची नोंद केलेली नाही अथवा इतर कारणास्तव विद्युत केंद्राच्या प्रगतकुशल प्रशिक्षणार्थींच्या यादीत नाव आढळून न आल्यास अथवा सदरील उमेदवार सदरील कोटयार्तंगत अर्जासाठी पात्र नसल्यास अशा उमेदवारांच्या प्रकरणी त्यांच्या अर्जाचा विचार सर्वसाधारण (महानिर्मितीतील पात्र प्रकल्पग्रस्त प्रगतकुशल प्रशिक्षणार्थी कोटा वगळून) कोटयार्तंगत करण्यात येईल. तसेच वरील कार्यवाही कोराडी CSR व तांत्रिक कंत्राटी बाह्यस्त्रोत कर्मचारी यांच्या प्रकरणी देखील लागू असेल.

४) ज्या उमेदवारांनी महानिर्मिती कंपनीच्या पात्र प्रकल्पग्रस्त प्रगतकुशल कोट्याअंतर्गत अर्ज केला आहे, परंतु त्यांच्या प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्राच्या वैधतेबाबत/पात्रतेबाबत महानिर्मिती कंपनीकडून निर्णय प्रलंबित आहे अथवा मा.न्यायालयात याचिका न्यायप्रविष्ठ आहे, अशा प्रकरणी उमेदवारांना केवळ तात्पुरत्या स्वरुपात प्रगतकुशल प्रशिक्षणार्थी कोट्यातून अर्ज करण्याची संधी देण्यात आली आहे. सदरील उमेदवारांच्या प्रकरणी महानिर्मिती कंपनीचा अंतीम निर्णय आणि/अथवा मा.न्यायालयाच्या अंतिम निर्णयानंतरच सदरील निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल. उमेदवारांच्या पात्रतेबाबत व त्यानुषंगाने निवडीबाबत केवळ अर्ज करण्याची संधी दिली आहे म्हणून पात्रतेबाबत

आणि/अथवा निवडीबाबतचा कोणताही अधिकार संबंधित उमेदवारास नसेल अथवा तसा कोणताही दावा स्वीकारण्यात येणार नाही, याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

५) जाहिरातीनुसार ऑनलाईन परीक्षेअंती गुणानुक्रमे कागदपत्रे पडताळणीस पात्र ठरत असलेल्या उमेदवारांच्या प्रकरणी इतर आवश्यक अटींसह महानिर्मिती कंपनी प्रशासकीय परिपत्रक क्र.४०० दि.२३.०१.२०१८ नुसार कार्यवाही करण्यात येईल याविषयी महानिर्मिती कंपनी प्रगतकुशल प्रशिक्षणार्थी यांनी विशेष नोंद घ्यावी.

६) उमेदवारांनी अर्जाद नमुद परीक्षा केंद्रातील पहिल्या पसंतीचे परीक्षा केंद्र बहुताश: उमेदवारांना उपलब्ध करुन देण्यात आले आहे. तथापी, काही परीक्षा केंद्रांसाठी जास्त अर्ज प्राप्त झाल्याने संबंधित परीक्षा केंद्राच्या क्षमतेअभावी, उमेदवारांना पसंतीच्या दुसऱ्या/ तिसऱ्या परीक्षा केंद्र उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

७) उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज सादर करतेवेळी स्वत:च्या नावाबाबत माहिती सादर केली आहे. त्याच नावाचे ओळखपत्र (उदा. मुळ आधारकार्ड, मुळ पॅनकार्ड इ.) सादर करणे आवश्यक आहे. तसेच ओळखपत्र तपासणी करताना कोणतीही तफावत आढळल्यास व उमेदवार ते सिद्ध न करू शकल्यास अशा उमेदवारांना परीक्षा केंद्रामध्ये प्रवेश देण्यात येणार नाही, याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

८) ऑनलाईन परिक्षेच्या वेळी परीक्षा कक्षामध्ये किंवा परीक्षा केंद्राच्या परिसरात भ्रमणध्वनी, ब्लूटूथ उपकरणे तसेच इतर संपर्काची साधणे तसेच डिजीटल घड्याळ, कॅलक्युलेटर, स्मॉर्टवॉच इ. उपकरणे वापरण्यास सक्त मनाई आहे. तसेच ऑनलाईन परीक्षेदरम्यान वरील प्रमाणे उपकरणे वापरताना आढळुन आल्यास संबंधित उमेदवारास अपात्र ठरवून त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

९) वरील पदाच्या ऑनलाईन परिक्षेत CCTV/Biometric Captureing इ. सुरक्षा साधनांचा वापर करण्यात येणार आहे, याची उमेदवारांनी विशेष नोंद घेण्यात यावी. तसेच आवश्यकता भासल्यास CCTV फुटेज व Biometric माहितीच्या आधारे ऑनलाईन परीक्षेच्याअंती तसेच भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर आणि नियुक्ती दिल्यानंतरही कोणताही गैरप्रकार केला असल्याचे आढळुन आल्यास व तसे सिद्ध झाल्यास सदरील उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल तसेच नियुक्ती दिली असल्यास अशा उमेदवाराची नियुक्ती रद्द करण्यात येईल व सदरील उमेदवाराविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

१०) उपरोक्त नमूद सर्व सूचना आणि जाहिरात क्र.०४/२०२४, सुधारपत्र व ऑनलाईन परीक्षेच्या प्रवेश पत्रामध्ये नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती यांचे उमेदवारांनी पुन:श्च वाचन करावे, जेणेकरुन उमेदवारास ऑनलाईन परीक्षेदरम्यान व भरतीच्या पुढील टप्प्यांवर कोणतीही अडचण निर्माण होणार नाही.

११) सर्व उमेदवारांना सूचित करण्यात येते की, ऑनलाईन परीक्षेसाठी परीक्षाकेंद्रावर आपणांस दिलेल्या वेळेच्या किमान ०१ तास अगोदर उपस्थित रहावे. जे उमेदवार परीक्षेच्या विहीत वेळेमध्ये परीक्षा केंद्रावर उपस्थित राहणार नाहीत अशा उमेदवारांना परीक्षा केंद्रामध्ये प्रवेश देण्यात येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१२) सर्व उमेदवारांना सूचित करण्यात येते की, परीक्षा केंद्र येथे उपस्थित असताना मे महिन्यातील ऊन्हाच्या तीव्र उष्णतेसाठी योग्य त्या उपाय-योजना करण्याबाबत खबरदारी घ्यावी. त्याबाबतची संपुर्ण जबाबदारी ही उमेदवाराची असेल.

(डॉ.नितीन वाघ)
कार्यकारी संचालक (मासं)
महानिर्मिती